क

नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, ग्रामपंचायत सांडवे ता.नगर यांना गैरवर्तनाबाबत ग्रामसेवक पदावरुन तात्पूरते दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद, अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग २
जिल्हा परिषद,आदेश क्रमांक.साप्रवि२/ग्राप३/223/२०२४
दिनांक १६मे २०२४

वाचा :- १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था -२ /३१२/२०२४ दिनांक- २३/०४/२०२४ (कर्तव्यात कसुर केले बाबत दोषारोप १ते ४)
२. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३
३. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१)(अ)

१. ज्या अर्थी श्री.नितीन शेषराव गिरी तत्कालीन ग्रामसेवक, सांडवे ता.नगर येथे कार्यरत असतांना यांनी त्यांचे कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर केलेला आहे. त्यांना या विषयी पुरेशी संधी देऊनही त्यांचे वर्तनात सुधारणा झालली नाही .जि.प.कर्मचा-याने सदैव निरपराद, सचौटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक आहे. तथापि, श्री गिरी नितिन शेषराव ग्रामसेवक यांनी गैरवर्तन करुन तसेच कर्तव्याचे पालन न करता महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम ३ चा भंग केलेला आहे.

२. ज्या अर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१) अ मध्ये दिलेल्या तरतूदीस अधीन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा शिस्तविषयक प्राधिकारण जिल्हा परिषद अहमदनगर या आदेशाव्दारे श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक,सांडवे ता.नगर यांचे विरुध्द शिस्तविषयक कार्यवाही अनिर्णित असल्याने यांना सदरचा आदेश बजावलेच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतुन सेवा ग्रामसेवक या पदावरुन निलंबीत करीत आहे.

३. आणखी, असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात राहील तेवढया कालावधीत श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, यांचे मुख्यालय पंचायत समिती कोपरगाव------ येथे राहिल आणि श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, यांना गटविकास अधिकारी पंचायत समिती ---कोपरगाव--- यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

४. श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, यांना महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल. तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

५. निलंबनाचे कालावधीत, श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, यांना निलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेव्हा देण्यात येईल. त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही. अथवा कोणताही खाजगी धंदा व

Scanned with OKEN Scanner

व्यवसाय करीत नाही. अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री.नितीन शेषराव गिरीग्रामसेवक, यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती नगर यांना सादर करावे.

६.निलंबनाचे कालावधीत श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गटविकास अधिकारी पंचायत समिती नगर हे करतील.

७. या आदेशाची नोंद श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.
सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202405160600 76 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अहमदनगर

प्रति,
श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, ग्रामपंचायत सांडवे ता.नगर
व्दारा :- गटविकास अधिकारी पंचायत समिती नगर
प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती नगर

२/-सदर आदेश श्री.नितीन शेषराव गिरी ग्रामसेवक, यांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.
प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती का/५२३११९, जि.अ.नगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर
प्रत- ग्रामपंचायत, अस्थापना कार्यासन-१ जिल्हा परिषद अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अहमदनगर

Scanned with OKEN Scanner